## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६५९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २२/०९/२०१७

**१) संगनमत करुन भांडण व शिवीगाळ करुन काठीने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २०/०९/२०१७ चे २१.०० वा दर. यातील फिर्यादी दशरथ शंकर बोरले वय ३० वर्ष, रा. जयतपुर हे संख्खे भाऊ असुन फिर्यादीने आरोपी क्र. १ ला गायीला काठीने का मारलास? असे म्हटले असता यातील आरोपीतानी संगनमत, भांडण व शिवीगाळ करुन आरोपी क्र १ ने फिर्यादीचे डोक्यावर काठीने मारुन दुखापत केली व आरोपी क्र. २ ने फिर्यादीचे उजव्या पायाचे मांडीवर काठीने मारुन जखमी केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ३२४,३२३,५०४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कठाणे पो.स्टे दिघोरी हे करीत आहेत.

**२) खोटे फेसबुक अकॉऊट तयार करुन आपली खरी ओळख लपवुन फसवणुक केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २१/०९/२०१७ चे पुर्वी पासुन यातील फिर्यादी हिचे नावाचे कुणीतरी अज्ञात आरोपी इसमाने फेसबुकवर खोटे अकॉऊट तयार करुन तिचे नातेवाईक व ओळखीचे लोकांना फ्रेन्ड रिकवेस्ट पाठवुन ती व्यक्ती फिर्यादी आहे असे भासवुन आपली खरी ओळख लपवुन फिर्यादीचे नावाचे खोटे फेसबुक अकॉऊट तयार केल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ४१९ भांदवि. सहकलम ६६(क) माहीती तंत्रज्ञान कायदा सन २००८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. गायकवाड पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

**३) लाचलुचपत प्रतीबंधक यांची कारवाई ;–**

दिनांक १८/०९/२०१७ चे १२.२३ वा. ते १४.४१ वा. दर. यातील आरोपी यांची तक्रार मंगेश मनोहर गोटे रा. राजापुर यांना त्याचे शेतावरील जप्ती ईलेक्ट्रीक मोटार व वॉयर परत करण्याकरीता आणि कायदेशीर कारवाही न करण्याकरीता दिनांक १८/०९/२०१७ रोजीचे पडताळणी व सापळा कार्यवाही दरम्यान तक्रारी कडुन ५,५००/–रु. रक्कमेची मागणी करुन स्विकारण्याची तयारी दर्शवील्याने पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ७ ला. प्र. का. सन १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोनी. पारधी पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) संगनमत करुन भांडण व अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन चाकुचा धाक दाखवुन जिवे मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद ;–**

दिनांक २०/०९/२०१७ चे १७.०० वा. दर. यातील फिर्यादी सोबत गणपतीचे जमा खर्चाचे हिसोबाचे कारणावरुन यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीस तु गणपतीचे वर्गणीचे हिसोब बरोबर केला नाही असे म्हणुन भांडण करुन अश्लिल शब्दात शिवीगाळ केली व ढकलढुकल करुन जिवे मारण्याची धमकी दिली तसेच आरोपी क्र. ३ ने आपले घरातील भाजी आणन्याचे चाकु आणुन फिर्यादीचा मुलगा संदीप भाजीपाले यास जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २९४,३२३,५०६,३४ भांदवि. सहकलम ४,२५ शस्त्र अधिनीयम १९५६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गदादे पो.स्टे. पवनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**५) अवैध दारू अडयावर धाडी . :–**

दिनांक २१/०९/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. कारधा, करडी, तुमसर, आंधळगाव, साकोली व लाखांदुर येथे अवैध दारू अडयावर धाडी घालुन एकुण ०७ गुन्हे दाखल करून ४५ लिटर हा.भ. दारू किंमती ३,५००/–रु, माल जप्त करण्यात आला. ९ लिटर ५००मिली लिटर देशी दारु + १ बोलेरो गाडी किंमती ८०६२५२/–रु. असा एकुण किंमती ८०९७५२/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

**(एस. व्ही. कुलकर्णी )**
**पोलीस उपअधिक्षक (गृह)**
**भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता